निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०८/२०१९/१११३

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :२१.०८.२०१९ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :२३.०८.२०१९ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :१३.११.२०१९ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :२९.११.२०१९ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**<u>अपील क्र. ०८/२०१९</u>**

**अपीलकर्ता :** श्रीमती साधना रमेश दळवी

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक २१.०८.२०१९ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत अर्ज केला. त्यानुसार प्रतिवादी यांनी दिनांक २३.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक १३.११.२०१९ रोजी वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २०.११.२०१९ रोजी नोटिस पाठवून दिनांक २८.११.२०१९ रोजी अपिल माहिती कायदा अंतर्गत दिलेल्या मुदतीच्या आत सादर न केल्यामुळे अपिल विलंब माफिवर प्रथमत: सुनावणी आयोजीत करून सुनावणी घेतली. सुनावणी च्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर होते. माहिती अधिकारी सुनावणीस उपस्थित होते, त्यांनी आपले मौखिक निवेदन सादर केले.



१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुदद्दे खालील प्रमाणे आहेत -

<u>मागितलेली माहिती:-</u>

१) रिलायन्स एनर्जी/अदानी इलेक्ट्रिसिटी यांच्याविरुद्ध दि.११/०१/२०१९ रोजी केलेल्या तक्रारीला अनुसरुन आपल्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या सगळया कारवाई/कार्यवाहीची माहिती तसेच उपलब्ध प्रति पुरविणे.

२) नवीन वीज जोडणी देतेवेळी वीज वितरक कंपनीने पाळावयाच्या नियमावलीची प्रत पुरविणे तसेच नियमावली न पाळल्यास संबंधित कंपनीवर करण्यात येणाऱ्या कारवाईच्या कायद्याची माहिती/प्रत पुरविणे

<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>

१) आपला अर्ज पुढील कार्यवाहीकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक, अदानी इलेक्ट्रीसीटी मुंबई लि. यांच्याकडे दि. २५.०१.२०१९ रोजी अग्रेषित केलेला आहे.

२) Kindly refer MERC (Electricity Supply Code and Other Conditions of Supply) Regulations, 2005 and MERC (Standards of Performance of Distribution Licensees, Period for Giving Supply and Determination of Compensation) Regulations, 2005 & 2014, which is available in downloadable format on Commission's website <u>www.merc.gov.in</u>

<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>

अ) माहिती अधिकार अर्जात मागीतलेल्या माहितीचा मुद्दा क्रमांक १) व २) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधीत तक्रारीला अनुसरून करण्यात आलेल्या कारवाईची/कार्यवाहीची माहिती मागीतली असता संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरवितेवेळी फक्त सदरचा अर्ज दि.२५.०१.२०१९ रोजी अदानी इलेक्ट्रीसिटी यांचेकडे अग्रेषित केल्याचे नमूद केले आहे. परंतु सदर दि.२५.०१.२०१९ रोजीच्या पत्राची प्रत किंवा अदानी इलेक्ट्रीसिटी यांचेकडून सदर पत्राला अनुसरून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाला पाठविण्यात आलेल्या उत्तराची/पत्राची प्रत आम्हाला पुरविण्यात आलेली नाही.

ब) माहिती अधिकार अर्जात मागीतलेल्या माहितीचा मुद्दा क्रमांक २) मध्ये मागणी करण्यात आलेली माहिती आम्हास पुरविण्यात आलेली आहे.

क) शिवाय सदर मूळचा तक्रार अर्ज हा रिलायन्स/अदानी इलेक्ट्रीसिटी यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे दिलेल्या वीज जोडणीबाबत असून रिलायन्स/अदानी इलेक्ट्रीसिटी यांचेकडून आम्ही वारंवार रास्त पुराव्यांसह तक्रारी करून देखील कोणतीही दखल प्रकरणी घेतली जात नाही याची आपण नोद घ्यावी.

<u>अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-</u>

१. अपिलार्थी यांनी सदरहू अपिल मुदतीत केलेले नाही. सबब अपिलावर विलंब माफी करीता सुनावणी झाली, त्यात अपिलार्थी गैरहजर होते. करीता अपिल दाखल का करावी त्यावर कारणमिमांसा अपिलार्थीकडून समाधानकारक कारण सांगितले गेले नाही. जेणे करून अपिल दाखल करण्यास सुमारे ५३ दिवसाचा अधिक वेळ लागला.

२. उपरोक्त अपिला संबंधाने प्रथमदर्शनी असे दिसून येते की, माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

३. अपिलार्थी यांची अपिल ही मुळत: तक्रार स्वरुपाची आहे व त्याची तक्रार निवारण या माहिती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही. करिता, सबब अपिल गुणवत्ताहिन असल्यामुळे खारीज करण्यात येते.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

अपिलार्थी यांची अपिल खारिज करण्यात येत आहे.

29/11/2019

(अनिलकुमार उके)

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्रीमती. साधना रमेश दळवी,
राहणार- कानजी नरशी चाळ,
शिवाजी चौक, दफतरी रोड,
मालाड (पूर्व) मुंबई-४०००९७.

29/11/2019

(अनिलकुमार उके)

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**